**नियमित दिवाणी दावा क्र. ५०/२०२०**
**संदिप जाधव व इतर वि.ग्रूप ग्रामपंचायत धोंडखार व इतर**
CNR No. MHRG090003402020

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

अर्ज, शपथपत्र व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींच्या वि.विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी तात्काळ एकतर्फा अंतरीम मनाई हुकूमाची विनंती केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, प्रतिवादी हे वाद मिळकतीभोवती असलेले वॉल कम्पाउंडचे बांधकाम तोडण्याच्या तयारीत आहेत. त्यामूळे वाद मिळकतीवरील वादींच्या शांततामय ताब्यास अडथळा होणार असून वादींचे अपरिमित नूकसान होणार आहे.

२. दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता वादी क्र. १ याने या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ३४/२०२० दाखल केला असून त्यात जेतवन बौध्दजन विकास मंडळ व इतर हे पक्षकार आहेत. त्यात त्याच्या लाभात निशाणी ५ व ६ वरील अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. वादींचे स्पष्ट म्हणणे आहे की, प्रतिवादींनी वादग्रस्त वॉल कंम्पाउंडचे बांधकाम पाडण्याबाबत दि. २६/०६/२०२० रोजी वादींना नोटीस दिली होती. परंतू ती वादीवर न बजावता त्या दाव्यात तिची प्रत दाखल करण्यात आली. त्यास वादींनी वकिलांमार्फत उत्तर दिले परंतू ती घेण्यास प्रतिवादींनी नकार दिला. सदर बंद लखोट्याची प्रत वादींनी या दाव्याकामी दाखल केली आहे. तिचे अवलोकन करता वादींच्या कथनास दूजोरा मिळतो.

३. वादींचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादींनी नियमित दिवाणी दावा क्रमांक

३४/२०२० मधील निशाणी ५ व ६ वरील आदेश पारीत झाल्यानंतर दि. १९/०९/२०२० रोजी दि. २६/०६/२०२० रोजीची नोटीस लॅमिनेट करुन वाद मिळकतीवर चिकटविली आहे. वादींनी पूढे म्हटले आहे की, प्रतिवादी हे दि. ३०/०९/२०२० रोजी सदर वॉल कम्पांउंड पोलीस बंदोबस्तात पाडणार आहेत अशी खात्रीशीर माहिती वादींना मिळाली आहे.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता वादींनी केलेले वॉल कंपाउंडचे बांधकाम हे कायदेशीर आहे अथवा नाही तसेच प्रतिवादी हे वादीविरुध्द करीत असलेली कार्यवाही नियमानूसार आहे अथवा नाही हे आजरोजी सकृतदर्शनी ठरविता येत नाही. परंतू वादींच्या म्हणण्यानूसार प्रतिवादी हे दि. ३०/०९/२०२० रोजी वॉल कम्पाउंड पाडण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी या अर्जापूष्ट्यर्थ वादी क्र. २ हिचे शपथपत्रही दाखल केले आहे.

५. म्हणून उपरोक्त बाबी विचारात घेता आजरोजी वादींच्या लाभात एकतर्फा तात्पूरता मनाई हूकूम पारित करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. तो पारीत न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल व तात्पूरत्या मनाई हूकूमाचा अर्ज तसेच दावा दाखल करण्याचा उद्येश असफल होईल. याउलट प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. म्हणून या सर्व बाबी विचारात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) प्रतिवादी, त्यांचे नोकर, चाकर, एजंट अथवा प्रतिवादींतर्फे कोणीही वाद मिळकत जी या अर्जाच्या परिच्छेद क्र. १ मध्ये सविस्तरपणे नमूद आहे त्यावरील वादींच्या वहिवाटीस व उपभोगास बाधा येईल असे कुठलेही कृत्य करू नये अथवा वादमिळकती भोवती असलेले वॉल कम्पाउंड तोडू नये असा एकतर्फा अंतरीम मनाई आदेश या दाव्याच्या पुढील तारखेपर्यंत देण्यात येतो.

२) प्रतिवादींना एकतर्फा अंतरीम आदेश कायम का करण्यात येऊ नये याची कारणे दाखवा नोटीस काढा.

३) वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ३९ नियम ३अ ची पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2020.09.28 16:33:09 +0000

स. दि. कमलाकर
दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर),
रोहा, जि. रायगड. अलीबाग.

दिनांक : २८/०९/२०२०